महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिम
ग्रामसभा आयोजित करुन तंटामुक्त गाव समितीची निवड करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
**गृह विभाग**
शासन परिपत्रक क्र.तंमुगा-१००८/सीआर-१३/पोल-१५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक : १७ जानेवारी, २००८.

**वाचा** : १) गृह विभाग, शासन निर्णय, क्रमांक १००७/सीआर २३८/पोल-८, दिनांक १९.७.२००७.
२) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक व्हीपीएम २००७/प्र.क्र.१०४/पंरा-३, दि.१०.८.२००७.

**परिपत्रक** :- राज्यामध्ये "महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिम" गृह विभाग शासन निर्णय दिनांक १९.७.२००७ अन्वये दि.१५ ऑगस्ट, २००७ पासून सुरु करण्यात आली आहे. शासन निर्णय, दि.१९.७.२००७ च्या परिच्छेद ६(३)(१) अन्वये राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना ग्रामसभा आयोजित करुन एक "तंटामुक्त गाव समिती" स्थापन करणे अनिवार्य केलेले आहे. तसेच परिशिष्ट -१अ नुसार दि.१५ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट या कालावधीत ग्रामसभा आयोजित करुन ग्रामपंचायतीने मोहिमेतील सहभाग निश्चित करावा व तंटामुक्त गाव समितीची निवड करावी असे शासन आदेश आहे. ग्रामपंचायतीच्या निवडणूका व अन्य काही कारणामुळे काही ग्रामपंचायतींना तंटामुक्त गाव समिती स्थापन करणे शक्य झाले नाही, म्हणून राज्यतील ज्या ग्रामपंचायतींनी अद्याप "तंटामुक्त गाव समिती" स्थापन करुन मोहिमेतील सहभाग निश्चित केलेला नाही त्या ग्रामपंचायतींना ग्रामसभा आयोजित करुन तंटामुक्त ग्राम समिती स्थापन करण्यास आणि मोहिमेची अंमलबजावणी करण्यास अनुमती देण्यात येत आहे. दिनांक ३० ऑगस्ट २००७ नंतर ग्रामसभा आयोजित करुन ज्या ग्राम पंचायतीनी मोहिमेतील आपला सहभाग निश्चीत केलेला आहे, त्या सर्व ग्रामपंचायती व ज्या ग्रामपंचायती यापुढे ग्रामसभा आयोजित करुन मोहिमेतील आपला सहभाग निश्चित करतील त्यांना पारितोषिकासाठी दि.१५ ऑगस्ट, २००८ ते दि.१४ ऑगस्ट, २००९ या वर्षासाठी सहभागी करुन घेण्यात येईल.

२. सदरचे परिपत्रक ग्राम विकास विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २३/वि भा अ, दिनांक २६/१२/२००७ अन्वये त्या विभागाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

मा.आ.गुट्टे
१७/१/०८

( मा. आ. गुट्टे )
अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

Circ. Ref
13/08

प्रति,
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई.
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व पोलीस अधीक्षक (१०० प्रतीसह. अद्याप मोहिमेत सहभागी न झालेल्या ग्रामपंचायतींना देण्याकरिता)
सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी
सर्व गट विकास अधिकारी
सर्व तहसीलदार (जिल्हाधिकारी यांचेमार्फत)
निवड नस्ती (पोल-१५).

6263